2 9 AUG 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसपर्क कक्ष
गवाजी विद्यापीठ, काल्हापूर

# महिलांना संधी, हक्क आणि सुरक्षिततेची जाणीव करून देण्यावर भर : प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव



**कोल्हापूर/प्रतिनिधी :** महिलांनी स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवून शिक्षण, विज्ञान-तंत्रज्ञान, रोजगार आणि समाजातील विविध क्षेत्रांत पुढे यावे, यासाठी त्यांना उपलब्ध संधी, सुविधा आणि हक्कांची माहिती असणे आवश्यक आहे. महिलांचा आत्मविश्वास आणि स्वावलंबन वाढविण्यासोबतच समाजातील प्रत्येक क्षेत्रात त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी संवाद आणि मार्गदर्शनाची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले. महिलांना सक्षमीकरणाच्या दिशेने प्रेरित करणाऱ्या 'She Talk'सारख्या उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करताना त्या बोलत होत्या.

शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थिनी वसतिगृह आणि स्वयंसिद्धा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'She Talk' उपक्रमात बोलताना डॉ. जाधव म्हणाल्या, महिलांना उपलब्ध असलेल्या विविध संधी, सुविधा, हक्क आणि सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन करून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, स्वावलंबन आणि निर्णयक्षमता निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. त्यामुळे महिलांनी उपलब्ध संधींचा केवळ लाभ न घेता स्वतःच्या क्षमता ओळखून आत्मनिर्भर होण्याची दिशा स्वीकारावी, असे आवाहनही डॉ. जाधव यांनी केले.

डॉ. प्रतिभा देसाई यांनी 'स्वयंसिद्धा' या महिलांसाठीच्या ॲपची माहिती देताना महिलांनी केलेले उपक्रम, मिळविलेले यश तसेच महिलांनी सामूहिकपणे राबविलेले उल्लेखनीय उपक्रम या माध्यमातून इतरांपर्यंत पोहोचविता येत असल्याचे सांगितले. तसेच 'स्त्रीशक्ती पोर्टल'वर नोंदणी करण्याची प्रक्रिया आणि त्याचा उपयोग याबाबत त्यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

विद्यार्थिनी वसतिगृहाच्या मुख्य अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी कार्यस्थळी महिलांच्या लैंगिक छळापासून संरक्षणासाठी असलेल्या 'POSH' कायद्याबाबत मार्गदर्शन केले. सुरक्षित कार्यस्थळ, महिलांचे कायदेशीर अधिकार, लैंगिक छळाच्या तक्रारींसाठी उपलब्ध यंत्रणा तसेच तक्रार निवारणाची प्रक्रिया याबाबत त्यांनी माहिती दिली.

साक्षी धनावडे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. कविता वड्राळे, डॉ. मीना पोतदार, विद्यार्थिनी वसतिगृहातील कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. डॉ. ज्योती खराडे यांनी आभार मानले.

2 9 AUG 2026

सकाळ

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गावागावांत पोहोचणार 'एनएसएस'चा शिक्षणदूत

## 'दूरशिक्षण'च्या प्रसारासाठी विद्यापीठाचा अभिनव उपक्रम; प्रत्येक प्रवेशामागे मिळणार मानधन

■ संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा


**कोल्हापूर, ता. २८ : ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने अभिनव पाऊल उचलले आहे. त्यात विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे (एनएसएस) स्वयंसेवक हे शिक्षणदूत बनणार आहेत. हे स्वयंसेवक त्यांच्या गावागावांतील तरुण-तरुणींना दूरशिक्षण व ऑनलाईन अभ्यासक्रमांची माहिती देण्यासह प्रवेशासाठी मदत करणार आहेत.**



अभ्यासक्रमांना प्रवेशित होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यामागे एनएसएस स्वयंसेवकाला पाचशे रुपये मानधन मिळणार आहे.

त्याला विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली आहे. शिक्षणाचा प्रसार आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम घडविणारा हा उपक्रम राज्यातील अन्य विद्यापीठांसाठी 'बेस्ट प्रॅक्टिस' ठरणार आहे. विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन केंद्रातर्फे विविध अभ्यासक्रमांच्या माध्यमातून उच्च शिक्षणाची संधी दिली जाते. मात्र, ग्रामीण भागातील अनेक तरुण-तरुणींना या अभ्यासक्रमांची माहिती नसते किंवा प्रत्यक्ष महाविद्यालयात प्रवेश घेणे शक्य होत नाही. आर्थिक, भौगोलिक, कौटुंबिक अथवा नोकरी-व्यवसायाच्या कारणांमुळे उच्च शिक्षणापासून दूर राहणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाच्या या संधी पोहोचविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जाणार आहे.

### दृष्टिक्षेपात




> उच्च शिक्षण हे शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याच्या दिशेने शिवाजी विद्यापीठाने टाकलेले हे एक ठोस पाऊल आहे. एनएसएसच्या सामाजिक कार्याला विद्यापीठाच्या शैक्षणिक विस्ताराशी जोडणारा हा प्रयोग यशस्वी झाल्यास राज्यातील इतर विद्यापीठांसाठी ते अनुकरणीय प्रारूप ठरणार आहे.
>
> **- डॉ. आर. के. कामत,**
> कुलगुरू

### दुहेरी भूमिका साकार होणार

■ एका बाजूला स्वयंसेवकांच्या नेतृत्वगुणांना, सामाजिक सहभागाला चालना मिळेल, तर दुसऱ्या बाजूला उच्च शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणाची नवी दारे खुली होतील. त्यामुळे 'विद्यार्थ्यांकडून समाजासाठी आणि समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण' अशी दुहेरी भूमिका या उपक्रमातून साकार होणार आहे. या उपक्रमाची व्याप्ती वाढविण्यासाठी एनएसएसच्या हिवाळी शिबिरादरम्यान विशेष 'शिक्षण प्रसार सप्ताह' राबविला जाणार आहे.

### शिक्षणदूत काय करणार?

■ शिक्षणदूत हे गावागावांमध्ये जाऊन स्थानिक तरुण-तरुणींशी संवाद साधतील. दूरशिक्षण व ऑनलाईन केंद्रातील उपलब्ध अभ्यासक्रम, प्रवेश प्रक्रिया, पात्रता आणि शिक्षणाच्या संधी याबाबत त्यांना माहिती देतील. इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत मार्गदर्शन करून प्रत्यक्ष प्रवेश घेण्यासाठी स्वयंसेवक मदत करतील.

29 AUG 2026
सिंधुदुर्ग समाचार
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संवाद, जनजागृतीच्या माध्यमातून तृतीयपंथींचे समावेशन शक्य : कुलगुरू



कोल्हापूर/प्रतिनिधी :

संवाद आणि जनजागृती या माध्यमातून तृतीयपंथी नागरिकांचे मुख्य प्रवाहात समावेशन करण्यासाठी सार्वत्रिक प्रयत्नांची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आज सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालय, कोल्हापूर आणि विद्यापीठाचे सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'तृतीयपंथीय कल्याण, हक्क व संरक्षण कायदा २०१९ व सुधारित नियम २०२०' यांच्या अंमलबजावणी संदर्भात आयोजित एकदिवसीय कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. कामत बोलत होते. यावेळी समाजकल्याणचे सहायक आयुक्त सचिन साळे, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रेश्मा पाटील, शासनाच्या तृतीयपंथी हक्क कल्याण समिती सदस्य मयुरी आळवेकर आणि शिवानी गजबर प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या भूमीत सामाजिक समतेची मुहूर्तमेढ रोवली गेली. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी आणि संविधानाने प्रत्येक नागरिकाला, त्याची लैंगिक ओळख कोणतीही असो, सन्मानाने जगण्याचा मूलभूत अधिकार दिला. मात्र, कायद्यात अधिकारांची तरतूद असली तरी समाजात त्याबाबत व्यापक जनजागृती आणि सातत्यपूर्ण संवादाची गरज आहे. तृतीयपंथी समुदायातील अनेक व्यक्ती सामाजिक भीती अथवा संकोचामुळे आपली ओळख उघडपणे मांडत नाहीत. त्यामुळे त्यांच्यापर्यंत पोहोचून त्यांचे अनुभव, अडचणी आणि अपेक्षा समजून घेणे तसेच समाजाने त्यांचा स्वीकार करणे आवश्यक आहे. तृतीयपंथी समुदाय हा समाजाचा उपेक्षित नव्हे, तर अविभाज्य घटक असून त्यांच्या हक्कांसाठी आणि सक्षमीकरणासाठी काम करणे ही समाजाची जबाबदारी आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. तृतीयपंथी बांधवांसाठी संवेदनशील वातावरण, सर्वसमावेशक पायाभूत सुविधा, शैक्षणिक संधी तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठ कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

'तृतीयपंथीयांची आपत्ती व्यवस्थापन टीम हे समावेशाचे प्रभावी उदाहरण'

कोल्हापूर जिल्हा प्रशासनाच्या पुढाकाराने देशातील पहिली तृतीयपंथीयांची आपत्ती व्यवस्थापन टीम उभारण्यात आल्याचा उल्लेख करून डॉ. कामत म्हणाले, पूरस्थितीत बोट चालविणे, बचावकार्य आणि प्रथमोपचार यासाठी ही टीम सक्षम आहे. समाजाकडून अनेकदा उपेक्षा सहन करावी लागलेल्या समुदायाने संकटकाळात इतरांच्या जीवितरक्षणाची जबाबदारी स्वीकारणे, हे सक्षमीकरणाबरोबरच सामाजिक समावेशाचे प्रभावी उदाहरण आहे. समता, बंधुता, न्याय आणि करुणा या मूल्यांवर आधारित समाजाच्या निर्मितीसाठी प्रशासन, शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना आणि नागरिकांनी एकत्रितपणे कार्य करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मयुरी आळवेकर यांनी, शिवाजी विद्यापीठाने तृतीयपंथीयांना उच्चशिक्षणाच्या प्रवाहात सामावून घेतले आहे. त्यांना वेळोवेळी उद्भवणाऱ्या समस्या सोडविण्यातही पुढाकार घेतला आहे. तथापि, व्यापक समाजाने तृतीयपंथीयांना वेगळे न पाहता त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात सामावून घ्यावे आणि त्यांना आवश्यक ते सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, सामाजिक समावेशन केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी शुभेच्छापर मनोगते व्यक्त केली. सहायक आयुक्त सचिन साळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. समाजकल्याणचे तालुका समन्वयक सचिन परब यांनी सूत्रसंचालन केले, तर समाजकल्याण अधिकारी अक्षय कुरणे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला पोलीस अधिकारी अंजली केसरकर यांच्यासह डॉ. किशोर खिलारे, डॉ. दीपक भोसले, डॉ. सरोज बीडकर तसेच समाजकल्याण विभागाचे अधिकारी, कर्मचारी, विविध महाविद्यालयांचे शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तृतीयपंथी समजून घेताना...

दरम्यान, आज दिवसभरात झालेल्या विविध सत्रांमध्ये तृतीयपंथीय नागरिकांच्या समस्या, त्यांचे निराकरण, त्यांना सहकार्य आणि कायदेशीर मदत या अनुषंगाने महत्त्वपूर्ण चर्चा झाली. कोल्हापूर जिल्हास्तरीय तृतीयपंथी हक्क व तक्रार निवारण समिती सदस्य शिवानी गजबर यांनी 'तृतीयपंथी समजून घेताना...' या विषयावर अतिशय अंतर्मुख करणारे सादरीकरण केले. त्यानंतर 'तृतीयपंथी कायदे व धोरणांबाबत सामाजिक जागृती' या विषयावर अविनाश भाले यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

[विद्यापीठ, कोल्हापू]
2 9 AUG 2026
पुढारी

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आज शिवाजी विद्यापीठात 'वॉकॅथॉन'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे शनिवारी (दि. २९) सकाळी ७ वाजता वॉकॅथॉन स्पर्धा होणार आहे.

शारीरिक तंदुरुस्ती, आरोग्य, क्रीडा संस्कृती व नियमित व्यायामाबाबत जागरूकता निर्माण करणे हा वॉकॅथॉनचा प्रमुख उद्देश आहे. सकाळी साडेदहा वाजता मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येणार आहे. कार्यक्रमास कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत.

2 9 AUG 2026

सकाळ

# विद्यापीठात आज 'वॉकथॉन'

कोल्हापूर : राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा विभागातर्फे उद्या, शनिवारी सकाळी सव्वासात वाजता विद्यापीठ परिसरात वॉकथॉन स्पर्धा होणार आहे. महान भारतीय हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे सहभागी होणार असल्याची माहिती क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी दिली.

2 9 AUG 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
…वाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'चंद्रपूरच्या जंगलात' चे आज विद्यापीठात अभिवाचन

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाचा बी. ए. फिल्म मेकिंग विभाग आणि 'एन अनुप जत्राटकर मल्टीमीडिया प्रॉडक्शन्स' यांच्या संयुक्त विद्यमाने 'चंद्रपूरच्या जंगलात...' या नाटकाच्या १५ व्या अभिवाचनाचे आयोजन शनिवार २९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता मास कम्युनिकेशन विभागात केले आहे.

नाट्य आणि अभिवाचनाच्या क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या 'अवकाश' प्रस्तुत 'चंद्रपूरच्या जंगलात...' चे संहिता लेखन ज्येष्ठ



लेखक विक्रम वाटवे यांनी केले आहे. दिग्दर्शन हृदयनाथ जाधव यांनी केले असून, या कलाकृतीला रंगमंचावर जिवंत करण्याचे काम सुप्रसिद्ध अभिवाचक समीर दळवी आणि दिग्दर्शक हृदयनाथ जाधव हे दोघे मिळून करणार आहेत.

या कलाकृतीच्या निर्मितीप्रवासात प्रसाद पवार, मनोहर दिचवलकर, सुनील देसाई यांचे विशेष सहकार्य व योगदान लाभले आहे. कला, साहित्य आणि नाट्यसंस्कृतीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित केलेला हा अभिवचन प्रयोग विनामूल्य ठेवला असून 'प्रवेश सर्वांना खुला' आहे. कार्यक्रमाला सर्व नाट्यरसिक, विद्यार्थी, शिक्षक आणि कलाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन फिल्म मेकिंगचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव आणि अनुप जत्राटकर यांनी केली आहे.

2 9 AUG 2026

लोकमत



**वॉकेथॉन :** राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विशेष वॉकेथॉन, स्थळ : क्रीडा विभाग, शिवाजी विद्यापीठ, सकाळी ७ वाजता

**अभिवाचन :** बी.ए. फिल्म मेकिंग विभाग आणि 'एन अनुप जत्राटकर मल्टीमीडिया प्रॉडक्शन्स' तर्फे समीर दळवी, दिग्दर्शक हृदयनाथ जाधव यांचे 'चंद्रपूरच्या जंगलात...' नाटकाचे अभिवाचन, स्थळ : मास कम्युनिकेशन विभाग, शिवाजी विद्यापीठ, वेळ : सकाळी ११ वा.

2 9 AUG 2026

सकाळ

# विद्यापीठात आज 'चंद्रपूरच्या जंगलात'चे अभिवाचन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा बी. ए. फिल्म मेकिंग विभाग आणि 'एन अनुप जत्राटकर मल्टिमीडिया प्रॉडक्शन्स' यांच्यातर्फे 'चंद्रपूरच्या जंगलात...' या नाटकाचे १५ वे अभिवाचन उद्या, शनिवारी सकाळी अकरा वाजता मास कम्युनिकेशन विभागात होणार आहे. या नाटकाचे संहिता लेखन ज्येष्ठ लेखक विक्रम वाटवे यांनी केले आहे. दिग्दर्शन हृदयनाथ जाधव यांनी केले आहे. या कलाकृतीला रंगमंचावर जिवंत करण्याचे काम अभिवाचक समीर दळवी आणि दिग्दर्शक हृदयनाथ जाधव करणार आहेत.

2 9 AUG 2026

तरुण भारत

# 'चंद्रपूरच्या जंगलात' नाटकाचे आज अभिवाचन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा बी. ए. फिल्म मेकिंग विभाग व 'एन अनुप जत्राटकर मल्टीमीडिया प्रॉडक्शन्स" यांच्या संयुक्त विद्यमाने 'चंद्रपूरच्या जंगलात" या नाटकाच्या १५ व्या अभिवाचनाचे आयोजन केले आहे. मास कम्युनिकेशन विभागात आज सकाळी ११ वाजता अभिवाचन होणार आहे. नाट्य व अभिवाचनाच्या क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या 'अवकाश" प्रस्तुत 'चंद्रपूरच्या जंगलात"चे संहिता लेखन ज्येष्ठ लेखक विक्रम वाटवे यांनी केले आहे. दिग्दर्शन हृदयनाथ जाधव यांनी केले असून या कलाकृतीला रंगमंचावर जिवंत करण्याचे काम सुप्रसिद्ध अभिवाचक समीर दळवी आणि दिग्दर्शक हृदयनाथ जाधव हे दोघे मिळून करणार आहेत.

2 9 AUG 2026

जनप्रवास

# संविधानातील बंधुता मूल्य सर्वोच्च : डॉ. काश्यपायन

**कोल्हापूर :** परस्परांमध्ये ऐक्य आणि मानवतेची भावना निर्माण व्हावी, यासाठी संविधानाची गरज आहे. भारतीय संविधान मानवतावादाची शिकवण देणारे असून, त्यातील बंधुता मूल्य सर्वोच्च महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन भन्ते डॉ. यश काश्यपायन यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या आजी-माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्यात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी होते. केंद्राचे संचालक डॉ. पवन गायकवाड यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सागर कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. शशिकांत कांबळे, सुरेखा नरदे, विजय कुशाण, नेहा विटेकरी, सुप्रभा चोपडे, सिद्धार्थ दीक्षित होते.

2 9 AUG 2026
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'संविधानातील बंधुता मूल्य महत्त्वाचे'

कोल्हापूर, ता. २८ : भारतीय संविधान मानवतावादाची शिकवण देणारे आहे. त्यातील बंधुता मूल्य महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन भन्ते डॉ. यश काश्यपायन यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या आजी-माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

माणसाने दुसऱ्या माणसाचा शत्रू होऊ नये. परस्परांमध्ये ऐक्य आणि मानवतेची भावना निर्माण व्हावी, यासाठी संविधानाची गरज असल्याचे डॉ. काश्यपायन यांनी सांगितले.

पाली भाषा संवर्धनाची चळवळ ही केवळ भाषेपुरती मर्यादित न राहता विचारांची चळवळ बनली पाहिजे, अशी अपेक्षा डॉ. शिंदे यांनी व्यक्त केली. धम्माचे अभ्यासक अमित मेधावी यांनी पाली भाषा ही केवळ एक प्राचीन भाषा नसून, भारतीय मानवतावादी परंपरेचे मूळ तत्त्वज्ञान समजून घेण्याची गुरुकिल्ली असल्याचे सांगितले. शशिकांत कांबळे, सुरेखा नरदे, विजय कुशाण, नेहा विटेकरी, सुप्रभा चोपडे, सिद्धार्थ दीक्षित, समर्थ भारतीय, डॉ. बालाजी लातुरे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. कुलवीर कांबळे, दीपा श्रावस्ती, अमोल मिणचेकर उपस्थित होते. केंद्राचे संचालक डॉ. पवन गायकवाड यांनी स्वागत केले. सागर कांबळे यांनी सूत्रसंचालन केले.

2 9 AUG 2026

पुढारी

# 'दूरशिक्षण' अभ्यासक्रमांच्या प्रवेशास १० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी सुरू असलेल्या विविध पदवी, पदव्युत्तर आणि ऑनलाईन अभ्यासक्रमांच्या प्रवेशास १० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. दूरशिक्षणांतर्गत बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास), एम.कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरू आहेत. तसेच, ऑनलाईन पद्धतीने एम.बी.ए., एम.कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. विद्यापीठाच्या ८९ अभ्यासकेंद्रांमार्फत प्रवेशाची सुविधा उपलब्ध आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार नियमित महाविद्यालय किंवा मुक्त विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नियमानुसार दुहेरी पदवीची संधीही उपलब्ध आहे. इच्छुकांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून अथवा ऑनलाईन प्रवेश पोर्टलद्वारे प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

2 9 AUG 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संगणकशास्त्राची वाढली क्रेझ, 'एमसीए' प्रवेशासाठी मोठी रेस

## यंदा तब्बल ३३ हजारांहून अधिक अर्ज; विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रमाकडे कल

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डेटा सायन्स व आयटी क्षेत्रातील वाढत्या रोजगाराच्या संधींमुळे संगणकशास्त्राशी संबंधित अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा कल वाढला आहे. यंदा मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन (एमसीए) अभ्यासक्रमासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे सहा हजारांनी वाढ झाली आहे. यंदा तब्बल ३३ हजार अर्ज आले आहेत.






महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे (सीईटी सेल) शैक्षणिक वर्ष २०२६-२७साठी एमसीएच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची दुसरी फेरी नुकतीच जाहीर झाली. या फेरीसाठी १८ हजार ९० जागा उपलब्ध होत्या. त्यापैकी १६ हजारांहून विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम भरले. यातील ७ हजार ५०० विद्यार्थ्यांना पसंतीक्रमानुसार महाविद्यालयात प्रवेश उपलब्ध झाला आहे. ६ हजार ३२७ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे. प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना संबंधित महाविद्यालयात प्रवेश घेणे बंधनकारक आहे.

### नामांकित महाविद्यालयांचे कटऑफ वाढले

'एमसीए'साठी गेल्या वर्षी २७ हजार अर्ज आले होते. यावर्षी ही संख्या ३३ हजारांवर पोहोचली आहे. नामांकित महाविद्यालयांचे कटऑफही वाढले असून तिसऱ्या फेरीत स्पर्धा आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

> शिक्षणामध्ये 'एआय'चा वापर सुरू झाला असून ते भविष्य आहे. सर्व क्षेत्रात 'एआय'चा वापर सुरू झाला आहे. प्रत्येक विषयात याचा वापर होत असल्याने रोजगाराच्या संधी मिळत आहेत. त्यामुळे संगणकशास्त्राशी संबंधित कोर्सेसला विद्यार्थांची पसंती वाढत आहे.
> – **डॉ. कविता ओझा**, संगणकशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ

सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, डेटा ॲनालिटिक्स आणि सायबर सुरक्षा यासारख्या क्षेत्रात नोकरीच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत व्यावसायिक आणि तांत्रिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे. विविध अभ्यासक्रमांसाठी मिळणाऱ्या सवलती व शिष्यवृत्ती योजनांमुळे विद्यार्थ्यांचा कल तंत्रशिक्षणाकडे जास्त असल्याचे दिसत आहे.

जनसंपर्क कक्ष
29 AUG 2026 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

Estd : 1962
"A++" Accredited by
NAAC (2021) with CGPA 3.52

Shivaji University, Kolhapur invites Expression of Interest (EOI) from experienced and competent Environmental Consultants/Agencies (NABET Accredited) for providing professional consultancy services related to environmental management, statutory compliances, infrastructure development guidance, Liaisoning and follow-up with the Maharashtra Pollution Control Board and other statutory authorities by the Registrar, Shivaji University, Kolhapur.

The consultant shall assist the institution in ensuring compliance with applicable environmental norms, consent conditions, wastewater management, solid waste management, environmental clearances and sustainable infrastructure practices within the campus/premises

Relevant information and terms and conditions are available on University's web-site www.unishivaji.ac.in at (Other Quotation / Tenders List). Interested parties who are willing to comply with the terms and conditions published should submit offline proposals in **Inward Section, Shivaji University, Kolhapur. Last date of proposal submission is 11/09/2026 upto 05:30 pm**.

Note:- 1) The corrigendum if any for above notice will not be published in newspaper. If there is any corrigendum to this notice it will be published on University's web-site www.unishivaji.ac.in only and it will be binding on the contractor. 2) Submission of EOI shall not confer any right on the applicant for appointment or award of work. 3) Right to accept or reject any or all the EOI's is reserved by the University without assigning any reason

Su/Engg/Civil /
Date:29/08/2026

Dr. V. N. Shinde
Registrar

2 9 AUG 2026

पुढारी

Estd: 1962

'A++' Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## पीएच.डी. प्रवेश सूचना २०२६-२७

शिवाजी विद्यापीठामार्फत पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया २०२६-२७ अंतर्गत पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत. अधिक माहितीसाठी विद्यापीठ अधिकृत संकेतस्थळ https://www.unishivaji.ac.in "Ph.D. Admission 2026-27" लिंकवर भेट द्यावी. सर्व तपशीलवार माहिती आणि Online अर्ज खालील लिंकवर उपलब्ध आहेत.

https://www.unishivaji.ac.in/admission/PhD-Admission-२०२६-२०२७

https://sukapps.unishivaji.ac.in/phd-entrance/#/login

**महत्वाचे दिनांक :**

- ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरु : विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दि. २९/०८/२०२६ रोजी दुपारी १२:०० वाजल्यापासून ते दि. १९/०९/२०२६ रोजी मध्यरात्री १२:०० वाजेपर्यंत अर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहेत.
- प्रवेश परीक्षेचे तपशीलवार वेळापत्रक आणि हॉल तिकीट विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक लॉगिन मध्ये उपलब्ध करून दिले जाईल.
- पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेची सविस्तर जाहिरात विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. लिंक https://www.unishivaji.ac.in/admission/PhD-Admission-2026-2027

दि. २९/०८/२०२६

स्थळ: कोल्हापूर

डॉ. व्ही. एन. शिंदे

कुलसचिव

जनसंपर्क कक्ष

29 AUG 2026 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd : 1962
"A++" Accredited by
NAAC (2021) with CGPA 3.52

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

Shivaji University, Kolhapur invites Expression of Interest (EOI) from experienced and competent Environmental Consultants/Agencies (NABET Accredited) for providing professional consultancy services related to environmental management, statutory compliances, infrastructure development guidance, Liaisoning and follow-up with the Maharashtra Pollution Control Board and other statutory authorities by the Registrar, Shivaji University, Kolhapur.

The consultant shall assist the institution in ensuring compliance with applicable environmental norms, consent conditions, wastewater management, solid waste management, environmental clearances and sustainable infrastructure practices within the campus/premises

Relevant information and terms and conditions are available on University's web-site www.unishivaji.ac.in at (Other Quotation / Tenders List). Interested parties who are willing to comply with the terms and conditions published should submit offline proposals **in Inward Section, Shivaji University, Kolhapur. Last date of proposal submission is 11/09/2026 upto 05:30 pm.**

Note:- 1) The corrigendum if any for above notice will not be published in newspaper. If there is any corrigendum to this notice it will be published on University's web-site www.unishivaji.ac.in only and it will be binding on the contractor. 2) Submission of EOI shall not confer any right on the applicant for appointment or award of work. 3) Right to accept or reject any or all the EOI's is reserved by the University without assigning any reason

Su/Engg/Civil /
Date:29/08/2026

Dr. V. N. Shinde
Registrar

29 AUG 2026

पुण्यनगरी

Estd: 1962

'A++' Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## पीएच.डी. प्रवेश सूचना २०२६-२७

शिवाजी विद्यापीठामार्फत पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया **२०२६-२७** अंतर्गत पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत. अधिक माहितीसाठी विद्यापीठ अधिकृत संकेतस्थळ https://www.unishivaji.ac.in "Ph.D. Admission 2026-27" लिंकवर भेट द्यावी. सर्व तपशीलवार माहिती आणि Online अर्ज खालील लिंकवर उपलब्ध आहेत.

https://www.unishivaji.ac.in/admission/PhD-Admission-२०२६-२०२७
https://sukapps.unishivaji.ac.in/phd-entrance/#/login

**महत्त्वाचे दिनांक :**

- **ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू : विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दि. २९/०८/२०२६ रोजी दुपारी १२:०० वाजल्यापासून ते दि. १९/०९/२०२६ रोजी मध्यरात्री १२:०० वाजेपर्यंत अर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहेत.**
- **प्रवेश परीक्षेचे तपशीलवार वेळापत्रक आणि हॉल तिकीट विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक लॉगिन मध्ये उपलब्ध करून दिले जाईल.**
- **पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेची सविस्तर जाहिरात विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. लिंक https://www.unishivaji.ac.in/admission/PhD-Admission-2026-2027**

दि. २९/०८/२०२६
स्थळ: कोल्हापूर

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव